



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १०८ * नांदेड * शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## भरधाव कारने दोन दुचाकींना उडवले; ४ जणांचा मृत्यू, एक जण गंभीर

### हडसणी फाट्यावर भीषण अपघात



**हदगाव (प्रतिनिधी)–** तालुक्यातील हडसणी फाटा येथे दि. २२ एप्रिल रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांसह एकूण चार जणांचा मृत्यू झाला आहे तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळेच हे बळी जात असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी गुरूवारी बांधकाम विभागाला घेराव घातला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, एम.एच. १२ के.एन. २५०९ या क्रमांकाच्या भरधाव स्विफ्ट डिझायर कारने हडसणी फाट्यावर दोन दुचाकींना जोरदार धडक दिली. यातील पहिल्या दुचाकीवरील रेखाबाई भाऊराव नरवाडे (वय ४२), मुलगा यशवंत भाऊराव नरवाडे (वय २३) आणि नणंद अनुसया बालाजी लोणाळे (वय ४३) या तिघांचा जागीच मृत्यू झाला.

तर दुसऱ्या दुचाकीवरील दोन व्यक्ती गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना तातडीने हदगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता, भोकर येथील रहिवासी असलेल्या एका व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दुसऱ्या जखमीला पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलवण्यात आले असून त्यांची प्रकृतीही चिंताजनक असल्याचे समजते. हडसणी फाटा हा सध्या मृत्यूचा सापळा ठरत आहे. धक्कादायक बाब म्हणजे दि. २१ एप्रिल रोजी याच ठिकाणी दोन अपघात झाले होते आणि दुसऱ्याच दिवशी हा भीषण थरार घडला. ग्रामस्थांनी यापूर्वी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदने देऊन व आंदोलने करून येथे गतिरोधक (स्पीड ब्रेकर), रेडियम इंडिकेटर्स आणि हायमास्ट लाईट बसवण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याने निरपराध नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. सततच्या अपघातांमुळे हडसणी गावातील नागरिक गुरूवारी प्रचंड आक्रमक झाले. संतप्त ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना घेराव घातला. जोपर्यंत या ठिकाणी रस्ता रुंदीकरण आणि अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत, तोपर्यंत आम्ही हटणार नाही, असा पवित्रा गावकऱ्यांनी घेतला आहे. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला.

या भीषण अपघातामुळे हडसणी परिसरात शोककळा पसरली आहे.

## पश्चिम बंगाल, तामिळनाडूमध्ये विक्रमी ८० टक्क्यांपेक्षा जास्त मतदानाची नोंद

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** २३ एप्रिल, गुरुवारी पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत विक्रमी मतदान झाले. बंगालमध्ये २९४ पैकी १५२ जागांवर पहिल्या टप्प्यातील मतदानात ९१.३५ टक्के मतदानाची नोंद झाली. तामिळनाडूमध्ये सर्व २३४ जागांवर विक्रमी ८४.२९ टक्के मतदान झाले.

दोन्ही राज्यांच्या इतिहासात प्रथमच सर्वाधिक मतदान झाले. निवडणूक आयोगाची आकडेवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंतची असून, त्यात बदल होण्याची शक्यता आहे.

यापूर्वी, ९ एप्रिल रोजी आसाम, केरळ आणि पुदुचेरीमध्येही विक्रमी मतदान झाले. आसाममध्ये इतिहासातील सर्वाधिक ८५.९१ टक्के मतदानाची नोंद झाली, पुदुचेरीमध्ये ९० टक्के आणि केरळमध्ये १९८७ नंतरचे सर्वाधिक ७८.२७ टक्के मतदान झाले. या पाचही राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी एकाच वेळी जाहीर केले जातील.

पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यासाठी १४७८ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद होत आहे. राज्यात सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यात थेट लढत आहे. निवडणूक काळात झालेल्या जाळपोळ, तोडफोड आणि मारहाणीच्या घटनांनी परिस्थिती तणावपूर्ण झाली आहे. मुर्शिदाबादमध्ये एजेयूपी प्रमुख आणि रेजीनगरचे उमेदवार हुमायून कबीर यांच्या ताफ्यावर दंगलखोरांनी काठ्या आणि विटांनी हल्ला केला. या घटनेनंतर टीएमसी आणि एजेयूपी कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संघर्ष झाला. कबीर यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून पोलिसांशीही त्यांचा वाद झाला. दक्षिण दिनाजपूरमधील कुमारगंजमध्ये भाजप उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावरही हल्ला झाल्याचा आरोप आहे. बूथ जॅमिंगची तक्रार मिळाल्यानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या सरकार यांना काही जणांनी मारहाण केल्याचे त्यांनी सांगितले.



**नांदेड :** भाजप महानगर युवा मोर्चाच्यावतीने गुरूवारी आयटीआय चौक परिसरात नारीशक्ती वन अधिनियम कायद्याला विरोध केल्याप्रकरणी काँग्रेससह विरोधी पक्षाच्याविरोधात घोषणाबाजी करत जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात महानगराध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजूरकर, महापौर कविता मुळे, सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष शशिकांत क्षीरसागर, सभापती सदिच्छा सोनी, ज्योती कल्याणकर, सुप्रिया रातोळीकर, कविता गड्डम, मंजुषा राणवळकर, ज्योत्स्ना लांडगे, सुषमा थोरात, उमेश चव्हाण, विजय येवनकर, ॲड. दिलीप ठाकूर आदी दिसत आहेत. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर, करणसिंह बैस)

## बारामती पोटनिवडणुकीत ५७.४८ टक्के मतदान

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी गुरुवारी शांततेत मतदान पार पडले. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार बारामतीत ५७.४८ टक्के तर राहुरीत ५५.३१ टक्के मतदान झाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अनुक्रमे बारामती,राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी गुरूवारी पोटनिवडणूक घेण्यात आली. पोटनिवडणुकीत तुलनेने कमी मतदान होते. मात्र, या पोटनिवडणुकीत निम्म्याहून अधिक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा संप तिसऱ्या दिवशीही सुरूच; कार्यालयात शुकशुकाट

**नांदेड (प्रतिनिधी)–** अनेक दिवसांपासून प्रलंबित असणाऱ्या मागण्यांसाठी राज्यसरकारी कर्मचाऱ्यांचा संप सुरू आहे. या संपाला तीन दिवस झाले आहेत. यामुळे कार्यालयात शुकशुकाट निर्माण झाला आहे.



या संपाद्वारे राज्यसरकारने मान्य केलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू करावी, कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भराव्यात, सेवानिवृत्त वय ६० वर्षे करावे, शिक्षकांना १०, २०, ३० या तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, १ नोव्हेंबर २००५ पुर्वी नियुक्त अंशतः अनुदानित शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, निकषपात्र विनाअनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार शंभर टक्के अनुदान देण्यात यावे या मागण्या करण्यात येत आहेत. काही तोडगा न निघाल्याने तिसऱ्या दिवशीही संप सुरू होता.

## नांदेड-बिदर रेल्वे प्रकल्पाला कर्नाटक सरकारचा नकार

### खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केली तीव्र नाराजी


**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांना जोडणाऱ्या बहुप्रतीक्षित नांदेड- बिदर रेल्वे प्रकल्पाबाबत एक धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकल्पाच्या एकूण खर्चापैकी आपल्या वाट्याचा ५० टक्के खर्च उचलण्यास कर्नाटकमधील राज्य सरकारने नकार दिला आहे. खा. अशोकराव चव्हाण यांनी कर्नाटक राज्य सरकारची ही भूमिका निराशाजनक व दोन्ही राज्यातील जनतेच्या अपेक्षांना हरताळ फासणारी असल्याची टीका केली आहे.

नांदेड येथे गुरुवारी पार पडलेल्या जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती 'दिशा'च्या बैठकीत रेल्वे विभागाच्या पायाभूत सुविधांच्या प्रगतीबाबतच्या अहवालातून ही गंभीर बाब उघडकीस आली. नांदेड-बिदर रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्राच्या भाजप महायुती सरकारने ५ फेब्रुवारी २०२४ रोजी आपल्या वाट्याचा ५० टक्के खर्च उचलण्याबाबतचा निर्णय घेतला होता. मात्र, रेल्वे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कर्नाटक सरकारने २७ सप्टेंबर २०२४ रोजी या प्रकल्पासाठी आपल्या वाट्याचा ५० टक्के खर्च उचलण्याबाबत नकार अनिच्छा व्यक्त केली आहे.

केंद्र तसेच महाराष्ट्र व कर्नाटक सरकारच्या ५०:५० टक्के खर्च भागीदारीतून सुमारे १५७ किलोमीटर लांबीचा हा रेल्वे प्रकल्प राबविण्यास केंद्र सरकाने संमती दिली होती. या प्रकल्पातील सुमारे १०१ किलोमीटरचा मार्ग महाराष्ट्रात तर ५६ किलोमीटर कर्नाटक राज्यात उभारला जाणार होता. या रेल्वे मार्गामुळे नांदेड येथील श्री हजूर साहिब आणि बिदर येथील श्री नानक झिरा साहिब ही दोन अत्यंत महत्त्वाची शीख तीर्थक्षेत्रे थेट रेल्वे मार्गाने जोडणे शक्य होणार आहे. त्यातून भाविकांना सुविधा तसेच पर्यटन, व्यापार व रोजगारनिर्मितीला चालना मिळणार होती. शिवाय नांदेड ते बंगळुरू दरम्यानचे रेल्वे अंतरही लक्षणीयरीत्या कमी झाले असते. त्यामुळे मागील अनेक वर्षांपासून या रेल्वे प्रकल्पाचा पाठपुरावा सुरु आहे.

माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी नांदेड-बिदर रेल्वे मार्गासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला असून, कर्नाटक सरकारच्या प्रतिकूल भूमिकेबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कर्नाटक सरकारने या प्रकल्पाचा प्रस्ताव नाकारल्याचे आता स्पष्ट झाले आहे. हा अन्याय असून, याविषयी आपण केंद्राच्या पातळीवर तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचे म्हटले आहे.




## शेतात विहीर न खोदताच पैसे उचलले; कंधारमध्ये दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतात विहीर न खोदताच पैसे उचलून फसवणूक केल्याप्रकरणी दोघांवर कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




कंधार तालुक्यातील दैठणा तलाठी सज्जा येथे सन २०११ ते १६ फेब्रुवारी २०१५ दरम्यान शामराव व्यंकटी पवार राहणार उदा नाईक तांडा तालुका कंधार हल्ली मुक्काम गडचांदूर जिल्हा चंद्रपूर आणि साहेबराव व्यंकटी पवार हल्ली मुक्काम बल्लारपूर जिल्हा चंद्रपूर यांनी संगणमत करून रमेश बाबुराव वारे राहणार नागलगाव तालुका कंधार यांच्या शेताच्या सातबारावर बनावट नोंदी करून खोटा फेरफार लावून सिंचन विहिरीचे शासनाकडून पैसे उचलून घेतले. विशेष म्हणजे विहीर न खोदताच रमेश वारे आणि शासनाची फसवणूक केली. ही बाब चौकशीअंती लक्षात आल्यानंतर रमेश वारे यांच्या फिर्यादीवरून कंधार पोलीस ठाण्यात वरील दोघांविरुद्ध न्यायालयाच्या आदेशावरून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक बगाडे करत आहेत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# सौरऊर्जेवर ‘दंड’: ग्राहकांवरील अन्यायाचा कडेलोट

ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबन, पर्यावरणपुरक विकास आणि आर्थिक बचत या तीनही उद्दिष्टांसाठी सौरऊर्जा हा अत्यंत महत्त्वाचा पर्याय मानला जातो. केंद्र व राज्य सरकारेही सौरऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबवत आहेत. मात्र अशा पार्श्वभूमिवर सौरऊर्जेवरच निर्बंध लादणारे आणि प्रति युनिट तब्बल ९.६६ रुपये दंड आकारण्याचा प्रस्ताव समोर येतो, तेव्हा तो केवळ विसंगतीच नव्हे तर ग्राहकांवर अन्याय करणारा निर्णय ठरतो. या नव्या नियमांनुसार सौरऊर्जेचा वापर केवळ सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेतच करण्यास परवानगी देण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय या वेळेबाहेर सौरऊर्जा वापरल्यास दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. ही अट वास्तवात कितपत व्यवहार्य आहे, याचा विचारच झालेला दिसत नाही. कारण सौरऊर्जा निर्मिती ही नैसर्गिक स्रोतावर अवलंबून असते; सूर्यप्रकाश असेल तेव्हाच उत्पादन होते. मग वापरावर वेळेचे बंधन घालणे म्हणजे ग्राहकांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणे होय. याद्वारा ग्राहकांना शिक्षा का? सौरऊर्जेचा वापर करणारे बहुतांश ग्राहक हे स्वतःच्या खर्चाने सोलार प्रकल्प उभे करतात. त्यांनी गुंतवणूक करून पर्यावरणपुरक पर्याय निवडला असताना त्यांनाच दंड आकारणे म्हणजे शासनाच्या धोरणातील मोठा विरोधाभास आहे. सरकार एका बाजूला ‘ग्रीन एनर्जी’चा पुरस्कार करत असताना दुसऱ्या बाजूला अशा प्रकारे आर्थिक बोजा टाकणे हे अयोग्य आहे. यामध्ये सर्वात गंभीर बाब म्हणजे ‘दादागिरी’चा आरोप. विद्युत पारेषण मंडळाकडून ग्राहकांवर जबरदस्तीने नियम लादले जात असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे. ग्राहकांचा आवाज न ऐकता, त्यांना चर्चेत सहभागी न करता असे निर्णय घेणे हे लोकशाही तत्त्वांना धरून नाही. म्हणूनच याचा ‘काळा कायदा’ म्हणून विरोध करणे अपरिहार्य झाले आहे. या नियमांना ‘काळा कायदा’ असे संबोधण्याची मागणी का होत आहे, याचे कारण स्पष्ट आहे. कोणताही कायदा जनहितासाठी असावा, पण येथे ग्राहकांचे नुकसान आणि कंपन्यांचे हित यांना प्राधान्य दिले जात असल्याचा संशय आहे. सौरऊर्जा वापरावर निर्बंध आणून पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबित्व वाढवण्याचा प्रयत्न असल्याची टीकाही होत आहे. जर सौरऊर्जेचा वापर मर्यादित केला, तर लोकांचा या क्षेत्रातील उत्साह कमी होईल. परिणामी पर्यावरणपुरक ऊर्जा वापराची गती मंदावेल. आजच्या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल अत्यंत घातक ठरू शकते. प्रति युनिट ९.६६ रुपये दंड हा सर्वसामान्य ग्राहकांसाठी मोठा आर्थिक धक्का आहे. हा एक प्रकारचा जिझिया करच आहे. आधीच महागाईच्या झळा सोसणाऱ्या नागरिकांवर हा अतिरिक्त बोजा टाकणे म्हणजे त्यांच्या अडचणींमध्ये भर घालणे होय. ग्रामीण भागातील शेतकरी, लघुउद्योग आणि मध्यमवर्गीय कुटुंबे यांच्यावर याचा सर्वाधिक परिणाम होईल. सौरऊर्जा ही अनेकांसाठी वीजबचतीचा आणि स्थिर ऊर्जेचा पर्याय आहे. पण अशा नियमां-मुळे लोक पुन्हा पारंपरिक वीजपुरवठ्याकडे वळतील. यामुळे वीज वितरण व्यवस्थेवर अधिक ताण येईल आणि दीर्घकालीन नियोजन कोलमडू शकते. कोणताही अन्यायकारक निर्णय रोखण्यासाठी लोकशाहीत नागरिकांचा आवाज महत्त्वाचा असतो. या संदर्भात ग्राहक संघटना, सामाजिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिकांनी एकत्र येऊन या निर्णयाचा विरोध करणे आवश्यक आहे. जिल्हा ग्राहक पंचायतांनी याबाबत आवाज उठवला आहे, ही सकारात्मक बाब आहे. मात्र हा लढा व्यापक पातळीवर नेण्याची गरज आहे. सरकारने आणि विद्युत पारेषण मंडळानेही या विरोधाची दखल घेऊन निर्णयाचा पुनर्विचार करावा. ग्राहकांशी संवाद साधून, त्यांच्या अडचणी समजून घेऊनच धोरणे आखली पाहिजेत अन्यथा राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था हाताच्या बाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण सौरऊर्जा ही भविष्याची गरज आहे, आणि तिच्यावर निर्बंध लादणे म्हणजे विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करणे होय. प्रति युनिट दंड, वेळेची बंधने आणि ग्राहकांवरील दबाव हे सर्व घटक मिळून हा निर्णय ‘काळा कायदा’ ठरवतात. अशा धोरणांचा निषेध होणे आवश्यक आहे. सरकारने तत्काळ हा निर्णय मागे घ्यावा, ग्राहकांवरील अन्याय थांबवावा आणि सौरऊर्जेला खऱ्या अर्थाने प्रोत्साहन द्यावे, अन्यथा जनतेचा रोष वाढत जाईल आणि हा मुद्दा व्यापक आंदोलनाचे रूप घेईल.

# पंचायती राज : तळागाळातील लोकशाहीचा पाया

भारताची लोकशाही ही केवळ निवडणुकांच्या चौकटीत मर्यादित न राहता ती समाजाच्या तळागाळात रुजलेली, प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून साकार होणारी एक सजीव व्यवस्था आहे. या व्यवस्थेचे सर्वात भक्कम अधिष्ठान म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्या संस्थांच्या केंद्रस्थानी असलेली पंचायती राज प्रणाली होय. दरवर्षी २४ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा ‘राष्ट्रीय पंचायती राज दिन’ हा या व्यवस्थेच्या ऐतिहासिक वाटचालीचे, तिच्या कार्यक्षमतेचे आणि लोकशाहीतील तिच्या अनन्यसाधारण योगदानाचे स्मरण करून देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे. हा दिवस केवळ उत्सव म्हणून साजरा करण्यापुरता मर्यादित नसून स्थानिक लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी बनवण्याचा एक सामूहिक संकल्प व्यक्त करण्याची संधी देतो.



भारतीय संस्कृतीच्या पायाभूत रचनेत ‘ग्राम’ ही संकल्पना केंद्रस्थानी आहे. प्राचीन काळापासून गाव हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचे केंद्र राहिले आहे. गावपातळीवर लोकांनी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवण्याची परंपरा होती. ग्रामसभा ही केवळ एक बैठक नसून ती लोकशाहीची मूळ शाळा होती, जिथे संवाद, चर्चा आणि सहमतीच्या आधारे निर्णय घेतले जात. ही परंपरा पुढेही विविध स्वरूपांत टिकून राहिली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महात्मा गांधी यांनी ‘ग्रामस्वराज्य’ या संकल्पनेला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, भारताचा खरा विकास हा गावांच्या स्वायत्ततेत आणि स्वावलंबनात आहे. प्रत्येक गाव हे एक स्वतंत्र प्रजासत्ताक असावे, जेथे लोक स्वतःच्या गरजांनुसार निर्णय घेतात आणि विकासाची दिशा ठरवतात, ही त्यांची भूमिका होती.

स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासनपद्धती स्वीकारली, परंतु सुरुवातीच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांना अपेक्षित ते बळ मिळाले नाही. ग्रामीण विकासासाठी विविध योजना राबवण्यात आल्या, मात्र त्या योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक लोकांचा सहभाग कमी असल्याने अपेक्षित परिणाम साध्य होत नव्हते. या पार्श्वभूमीवर १९५७ साली स्थापन झालेल्या बलवंतराव मेहता समितीने पंचायती राज व्यवस्थेची पुनर्रचना करण्याची शिफारस केली. या समितीने ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय रचनेची संकल्पना मांडली. या रचनेमुळे स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना देण्यात आले आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख बनले.

पुढील काळात अशोक मेहता समिती, जी. व्ही. के. राव समिती आणि एल. एम. सिंगवी समिती यांनी पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणून १९९२ साली भारतीय संविधानात ७३वी घटनादुरुस्ती करण्यात आली आणि २४ एप्रिल १९९३ पासून ती अंमलात आली. याच ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी २४ एप्रिल हा दिवस ‘राष्ट्रीय पंचायती राज दिन’ म्हणून साजरा केला जातो. या दुरुस्तीमुळे पंचायती राज संस्थांना संविधानिक दर्जा मिळाला आणि त्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांची स्पष्ट मांडणी करण्यात आली.

७३व्या घटनादुरुस्तीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामसभेला दिलेले महत्त्व होय. ग्रामसभा ही स्थानिक लोकशाहीची मूलभूत यंत्रणा आहे. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे सदस्य असतात आणि ते थेट निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. यामुळे लोकशाही अधिक व्यापक आणि समावेशक बनते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या संस्थांना विविध विकासकामांसाठी अधिकार देण्यात आले. नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख या सर्व प्रक्रियांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवण्यात आला.

या व्यवस्थेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक न्यायाची अंमलबजावणी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करून समाजातील वंचित घटकांना सत्तेत सहभागी होण्याची संधी देण्यात आली. विशेषतः महिलांसाठी किमान एक तृतीयांश आरक्षणामुळे ग्रामीण भागात महिला नेतृत्वाची एक नवीन लाट निर्माण झाली आहे. आज अनेक महिला सरपंच, पंचायत सदस्य आणि जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे ग्रामीण विकासात संवेदनशीलता आणि समावेशकता वाढली आहे.

पंचायती राज व्यवस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक पातळीवर लोकांच्या सहभागातून विकास साध्य करणे हा आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शेती, रोजगारनिर्मिती यांसारख्या विविध क्षेत्रांत ग्रामपंचायती महत्त्वाची भूमिका बजावतात. सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य या संस्थांमार्फतच केले जाते. त्यामुळे पंचायती राज व्यवस्था ही ग्रामीण विकासाचा कणा म्हणून ओळखली जाते.

तथापि, या व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने देखील आहेत. आर्थिक स्वायत्ततेचा अभाव, प्रशासकीय अडथळे, अधिकारांचे केंद्रीकरण आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. काही ठिकाणी पारदर्शकतेचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या समस्या देखील आढळतात. ग्रामसभांमध्ये नागरिकांचा कमी सहभाग हा देखील एक गंभीर मुद्दा आहे. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सततच्या सहभागातून सशक्त होते, ही जाणीव समाजात रुजवणे आवश्यक आहे.

या आव्हानांवर मात करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक आर्थिक स्वायत्तता देणे गरजेचे आहे. त्यांना करआकारणीचे अधिकार वाढवणे, निधीचे योग्य वितरण करणे आणि त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे. स्थानिक प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन त्यांची प्रशासनिक क्षमता वाढवणे आवश्यक आहे. ग्रामसभेचे महत्त्व वाढवून नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हीदेखील अत्यंत आवश्यक बाब आहे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल साधनांचा वापर करून पंचायती राज व्यवस्थेला अधिक प्रभावी बनवता येते. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून कामकाज अधिक पारदर्शक आणि जलद होते. नागरिकांना माहिती सहज उपलब्ध होते आणि सेवा सुलभपणे मिळतात. सामाजिक लेखापरीक्षण, माहितीचा अधिकार आणि जनसहभागाच्या विविध माध्यमांद्वारे उत्तरदायित्व वाढवता येते.

राष्ट्रीय पंचायती राज दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून तो स्थानिक लोकशाहीच्या बळकटीकरणाचा उत्सव आहे. या दिवशी देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान केला जातो आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचा आढावा घेतला जातो. यामुळे इतर संस्थांना प्रेरणा मिळते आणि विकासाची नवी दिशा मिळते.

आज भारत वेगाने प्रगती करत असताना ग्रामीण भागाचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरतो. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन आणि अंमलबजावणी आवश्यक आहे. पंचायती राज संस्था या प्रक्रियेत केंद्रस्थानी आहेत. त्या केवळ विकासाच्या यंत्रणा नसून लोकशाहीच्या जडणघडणीचा पाया आहेत.

शेवटी, राष्ट्रीय पंचायती राज दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व ओळखून त्यांना बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने ग्रामसभेत सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेत भाग घेतला पाहिजे. स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून त्यांचे समाधान शोधले पाहिजे. लोकशाही ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. पंचायती राज व्यवस्था ही भारतीय लोकशाहीची खरी आ-ळख आहे आणि तिच्या सशक्तीकरणातूनच देशाचा समतोल, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास साध्य होऊ शकतो.

**–डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९९६०१०६५८२

# नारी शक्ती वंदन अभियान : सर्वसमावेशक स्त्री सक्षमीकरणासाठी शासनाचा व्यापक उपक्रम



भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा मूलभूत अधिकार प्रदान केला असला तरी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रांमध्ये महिलांना अद्याप विविध अडचणींना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमिवर महिलांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात अधिक सक्षमपणे सहभागी करून घेण्यासाठी शासनाने नारी शक्ती वंदन अभियान हा महत्त्वपूर्ण व सर्वसमावेशक उपक्रम हाती घेतला आहे.

१. अभियानाची पार्श्वभूमी :

देशातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक वर्षांपासून विविध योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुसार महिलांच्या गरजा व अपेक्षा अधिक व्यापक झाल्या आहेत. या गरजांचा विचार करून महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी एकात्मिक दृष्टीकोनातून नारी शक्ती वंदन अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

२. अभियानाची दृष्टी व ध्येय :

या अभियानाची दृष्टी सशक्त महिला सक्षम राष्ट्र अशी असून महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर व निर्णयक्षम बनविणे हे त्याचे मुख्य ध्येय आहे.

यासाठी खालील बाबींवर विशेष भर देण्यात येतो

ङ महिलांना समान संधी व अधिकार प्रदान करणे
ङ सामाजिक न्याय व सुरक्षिततेची हमी देणे
ङ आर्थिक स्वातंत्र्य व उद्योजकतेला प्रोत्साहन देणे
ङ शिक्षण व कौशल्य विकासाद्वारे प्रगतीची संधी उपलब्ध करून देणे

३. अभियानाचे प्रमुख उद्दिष्टे :

* महिलांविषयी असलेली सामाजिक विषमता दूर करणे
* महिलांच्या हक्कांविषयी जनजागृती वाढविणे
* महिलांच्या आरोग्य, शिक्षण व पोषण स्थितीत सुधारणा करणे
* महिला स्वयंसहाय्यता गटांना बळकटी देणे
* महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देणे
* डिजिटल साक्षरता व तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे

४. अभियानाचे प्रमुख घटक :

(अ) शैक्षणिक सक्षमीकरण :

महिलांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे, शाळा सोडलेल्या मुलींना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे तसेच उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे.

(आ) आर्थिक सक्षमीकरण :

महिलांना स्वयंरोजगार, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये संधी उपलब्ध करून देणे. स्वयं-सहाय्यता गट (डक्रह) यांच्या माध्यमातून बचत व गुंतवणूक संस्कृती विकसित करणे.

(इ) आरोग्य व पोषण :

गर्भवती व स्तनदा महिलांसाठी विशेष आरोग्य सेवा, पोषण आहार योजना तसेच नियमित आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे.

(ई) सुरक्षा व कायदेशीर संरक्षण :

महिलांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर कायद्यांची अंमलबजावणी, हेल्पलाईन सेवा, तसेच पोलिस व न्यायव्यवस्थेतील संवेदनशीलता वाढविणे.

(उ) सामाजिक सक्षमीकरण :

लिंगभेद, बालविवाह, हुंडा प्रथा यांसारख्या सामाजिक कुप्रथांविरुद्ध जनजागृती करून महिलांना समान सन्मान मिळवून देणे.

(ऊ) राजकीय सक्षमीकरण :

स्थानिक स्वराज्य संस्था व इतर प्रशासकीय स्तरांवर महिलांचा सहभाग वाढविणे व नेतृत्वगुण विकसित करणे.

५. अंमलबजावणी यंत्रणा :

या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच विविध विभागांमध्ये समन्वय साधला जातो. ग्रामस्तरापासून जिल्हास्तरापर्यंत विविध समित्या स्थापन करून कार्यक्रमांची अंमलबजावणी व देखरेख केली जाते.

६. जनजागृती व सहभाग :

अभियानाच्या यशस्वीतेसाठी जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. यासाठी विविध माध्यमांद्वारे जनजागृती मोहीम राबविण्यात येतात. शाळा, महाविद्यालये, ग्रामसभा, महिला बचत गट यांच्यामार्फत महिलांना त्यांच्या हक्कांविषयी माहिती दिली जाते.

७. अपेक्षित परिणाम :

* महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारणा
* महिला साक्षरतेत वाढ
* रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींमध्ये वाढ
* महिलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये घट
* निर्णय प्रक्रियेत महिलांचा वाढता सहभाग

८. निष्कर्ष :

नारी शक्ती वंदन अभियान हे महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी एक प्रभावी व दूरगामी परिणाम करणारे पाऊल आहे. या अभियानाच्या माध्यमातून महिलांना केवळ सन्मान मिळणार नाही तर त्यांना स्वतःच्या क्षमतांचा विकास करून समाजाच्या प्रगतीत सक्रिय योगदान देण्याची संधी मिळेल.

महिलांचे सक्षमीकरण हेच राष्ट्राच्या शाश्वत विकासाचे मूळ आहे, ही जाणीव ठेवून प्रत्येक घटकाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे.

**–श्रीकांत चंद्रकांत देशमुख**
जिल्हा माहिती कार्यालय,
हिंगोली

# भारतरत्नाचा वाढदिवस

क्रिकेट हा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे म्हणूनच क्रिकेट हा भारताचा धर्म आहे असे मानले जाते आणि खेळात सचिन तेंडुलकर याने जी असामान्य कामगिरी केली आहे त्यामुळे त्याला क्रिकेटचा देव मानले जाते. आज याच क्रिकेटच्या देवाचा म्हणजे सचिन तेंडुलकरचा ५३ वा वाढदिवस आहे. २४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत सचिनचा जन्म झाला. त्याचे वडील रमेश तेंडुलकर हे प्राध्यापक होते तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक होते तर आई शिक्षिका होत्या. त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मन ह्यांच्या नावावरुन त्याचे सचिन असे नाव ठेवण्यात आले. सचिनने शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेत रमाकांत आचरेकर यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवायला सुरवात केली. रमाकांत आचरेकर यांनी बालवयातच सचिनची गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षण दिले. शाळेत असतानाच सचिनने त्याच्या शाळेतील सहकारी मित्र विनोद कांबळी याच्यासोबत हॅरिस शिल्ड स्पर्धेत ६६४ धावांची विक्रमी भागीदारी रचली.



सचिनने त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातच शतक झळकवण्याचा विक्रम केला. तेंव्हा त्याचे वय १५ वर्ष २३२ दिवस होते आणि त्यावेळी पहिल्या सामन्यात शतकी खेळी करणारा तो सर्वात तरुण खेळाडू होता. सचिन हा असा एकमेव खेळाडू आहे ज्याने रणजी, दुलीप व इराणी चषकाच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी केल्याने वयाच्या १६ व्या वर्षीच सचिनची भारतीय संघात निवड झाली. १९८९ साली त्याने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना पाकिस्तान विरुद्ध कराची येथे खेळला. त्या सामन्यात त्याने इम्रान खान, वसीम आक्रम, वकार युनूस, अब्दुल कादिर या दिग्गज गोलंदाजांचा सामना केला. अर्थात त्याला पहिल्या सामन्यात काही विशेष काही करता आले नाही. अवघ्या १५ धवांवर तो बाद झाला मात्र पुढच्या सामन्यात त्याने अर्धशतक झळकावुन आपल्या क्षमतेची चुणूक जगाला दाखवून दिली. त्यानंतर तो भारतीय संघासोबत न्यूझीलंड दौऱ्यावर गेला तिथे ८८ धावांची त्याने लाजवाब खेळी केली मात्र त्याला खरी ओळख मिळाली ती १९९१ - ९२ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात. या दौऱ्यात त्याने पर्थ मधील उसळत्या आणि वेगवान खेळपट्टीवर शतकी खेळी केली. ज्या खेळपट्टीवर जगभरातील दिग्गज फलंदाज तग धरू शकत नाही अशा खेळपट्टीवर सचिनने ऑस्ट्रेलियाच्या दर्जेदार गोलंदाजीसमोर शतक झळकवल्याने हा खेळाडू लंबी रेस का घोडा आहे असे जाणकार म्हणू लागले. त्यानंतर सचिनने मागे वळून पाहिले नाही.

जगभरातील सर्वच खेळपट्टीवर त्याने धावा काढायला सुरवात केल्या. १९९६ च्या विश्वचषकात त्याने सर्वाधिक धावा काढून गोल्डन बॅट मिळवली. १९९० च्या दशकात तर सचिनच्या बॅटने अक्षरशः धुमाकूळ घातला. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे अशा सर्वच संघविरुद्ध त्याने खोऱ्याने धावा केल्या. १९९७ साली विसडेनने त्याला त्या वर्षीचा सर्वोत्तम वार्षिक खेळाडू म्हणून घोषित केले. ह्याच वर्षी त्याने पहिल्यांदा कसोटीत १००० धावा केल्या. ह्याची सचिनने १९९९, २००१, २००२ साली पुनरावृत्ती केली. सचिनने वर्षात १००० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम सलग सहा वेळा केला आहे. असा करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सचिन तेंडुलकर हा क्रिकेट विश्वात डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानला जाणारा क्रिकेटपटू आहे.

२००२ मध्ये कारकिर्दीच्या बाराव्या वर्षीच, विसडेनने डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर सार्वकालिक दुसरा सर्वोत्तम कसोटीपटू व व्हीव्ह रिचर्डस नंतरचा दुसरा सार्वकालिक सर्वोत्कृष्ट एकदिवसीय फलंदाज म्हणून सचिन तेंडुलकरची निवड केली होती. स्वतः डॉन ब्रॅडमन यांनी सचिनच्या फलंदाजीत स्वतःची छबी दिसते असे म्हटले होते. २००३ साली दक्षिण आफ्रिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेत त्याला मालिका विराचा पुरस्कार देण्यात आला मात्र संघाला विश्वचषक जिंकता आला नाही याची त्याला खंत होती. देशाला विश्वचषक जिंकून द्यायचे हे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न २०११ साली पूर्ण झाले. सचिनचे दुसरे नाव म्हणजे विक्रम. विक्रमांचे विक्रम करण्याची असाधारण कामगिरी त्याने केली. त्यांचे विक्रम सांगायला गेलो तर पानही पुरणार नाही.

आंतरराष्ट्रीय सामन्यात १०० शतक करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सर्वाधिक धावा, सर्वाधिक सामनावीर, सर्वाधिक मालिकाविर सर्वात जास्त सामने असे कितीतरी विक्रम त्याच्या नावे आहे. त्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. राजीव गांधी खेलरत्न, पद्मविभूषण या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. भारतरत्न या देशाचा सर्वोच्च पुरस्काराने देखील त्याला गौरविण्यात आले. भारतरत्न मिळवणारा तो एकमेव खेळाडू आहे. तो राज्यसभेचा खासदारही होता. भारतीय हवाई दलाने त्याला ग्रुप कॅप्टन हा गौरवात्मक हुद्दा प्रदान केला आहे. त्याला अनेक विद्यापीठाची डिलीट ही मानाची पदवी मिळाली आहे. सचिनचा खेळ पाहतच आम्ही लहानाचे मोठे झालो. त्याचा खेळ पाहायला मिळाला हे आमच्या पिढीचे भाग्य. १३० कोटी भारतीयांना आनंद साजरा करण्याची संधी सातत्याने निर्माण करुन देणाऱ्या या क्रिकेटच्या देवाला ५३ व्या वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# तरोडा बु. भागात महावितरणचा मनमानी कारभार, विजेच्या लपंडावामुळे नागरीक हैराण; तीव्र आंदोलनाचा इशारा



**नांदेड (प्रतिनिधी) –** एकीकडे उन्हाचा पारा ४० अंशांच्या पार गेला असताना, दुसरीकडे नांदेड महानगरपालिका प्रभाग क्र. २ तरोडा बु. भागात महावितरणच्या गलथान कारभारामुळे नागरीक अक्षरशः 'होरपळून' निघत आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या विजेच्या सततच्या खेळखंडोब्यामुळे त्रस्त झालेल्या संतप्त नागरिकांनी अखेर गुरुवारी सकाळी महावितरणच्या उंबरठ्यावर धडक देत प्रशासनाला जाब विचारला आणि कडक शब्दांत निवेदन सादर केले. यावेळी दहा दिवसांत वीज पुरवठा सुरळीत नाही झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आनंद कल्याणकर व बालाजी पवार यांच्यासह उपस्थित नागरिकांनी दिला.

सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा काळ असून, रात्रीच्या वेळी वारंवार वीज जात असल्याने मुलांच्या भविष्याशी खेळ सुरू आहे. कडाक्याच्या उन्हामुळे ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांचे हाल होत आहेत. तेंव्हा दहा, बारा दिवसांत वीज पुरवठा सुरळीत करावा अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आनंद कल्याणकर यांनी नागरिकांच्यावतीने दिला.

तरोडा बु. भागात वीज कधी येईल आणि कधी जाईल याचा कोणताही नेम राहिलेला नाही. दिवसातून २०-२० वेळा वीज जात असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. वारंवार होणाऱ्या व्होल्टेजच्या चढ-उतारामुळे नागरिकांचे लाखो रुपयांचे फ्रीज, टीव्ही, एसी आणि पाण्याचे पंप जळून खाक होत आहेत. लहान लहान व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचे यावेळी बालाजी पवार यांनी सांगितले. नवीन डिपी व तातडीची दुरुस्ती करून वीज सुरळीत करण्याची मागणी केली. तसेच उपस्थित माणिक देशमुख यांनी आम्ही नियमित वीज बिल भरून झालेल्या आर्थिक नुकसानीला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल केला. वायरमन व संबंधित अधिकारी फोन उचलत नाहीत. त्यांनी नागरिकांचे समाधान केले पाहिजे, अशी मागणी उपस्थितांनी केली.

या निवेदनान्वये नागरिकांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, जर येत्या १०-१२ दिवसांत वीज पुरवठा सुरळीत झाला नाही, तर कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय महावितरणच्या कार्यालयावर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल.

यावेळी आनंद कल्याणकर, बालाजी पवार, माणिक देशमुख, वामनराव हंबर्डे, अशोक मोरे, संदीप देशमुख, अशोक पंडित, गिरीश पटवारी, अविनाश भायानी, माधव देशमुख, भरत कानिंदे, शिवाजी शिंदे, संतोष देबडवार, बालाजी कापसे, गणेश पवार यांच्यासह तरोडा बु. भागातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निवेदनावर प्रभाग क्र. २ मधील तरोडा बु. परिसरातील शेकडो नागरिकांच्या सह्या असून, आता महावितरण या मागणी प्रकरणी काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण भागातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## स्वारातीम विद्यापीठाची मान उंचावली; डॉ. सिंकू कुमार सिंग एआययूमध्ये जॉईंट सेक्रेटरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्राला मोठा सन्मान मिळाला असून, प्रा. डॉ. सिंकू कुमार सिंग यांची नवी दिल्ली येथील असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी (एआययू) मध्ये जॉईंट सेक्रेटरी (क्रीडा) या महत्त्वपूर्ण पदावर निवड झाली आहे. या नियुक्तीमुळे विद्यापीठासह संपूर्ण मराठवाडा विभागाची मान उंचावली आहे.

डॉ. सिंग यांना विद्यापीठ प्रशासन आणि क्रीडा क्षेत्रातील व्यापक अनुभव लाभला आहे. त्यांनी शिक्षणशास्त्र संकुलाचे संचालक म्हणून यशस्वीपणे कार्य केले असून, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. विविध शैक्षणिक व प्रशासकीय प्राधिकरणांवर काम करत त्यांनी आपल्या कार्यकुशलतेची ठळक छाप उमटवली आहे.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी (एआययू) ही देशभरातील विद्यापीठांची प्रमुख संस्था असून, क्रीडा विभागातील जॉईंट सेक्रेटरी या पदावर कार्य करताना डॉ. सिंग यांच्या अनुभवाचा राष्ट्रीय स्तरावर मोठा उपयोग होणार आहे.

# हळदव आश्रमाजवळ शॉटसर्किटमुळे शेतकऱ्यांचा चारा भस्म; अंदाजे तीन लाखांचे नुकसान




**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यातील हळदव आश्रमाजवळील शेतातील विद्युत खांबावर शॉटसर्किट होऊन शेतकऱ्यांचा संपूर्ण चारा जळून खाक झाला. या आगीत शेतकऱ्यांचे अंदाजे ३ लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे सांगण्यात येत आहे.

गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३.३० ते ४ वाजेच्या सुमारास सोपान चंद्रकांत शिंदे व गणेश प्रकाश शिंदे यांच्या शेत गट क्रमांक ४७५/४ मधून म. रा. वि. महावितरणच्या पोलवरील विद्युत तारेला शॉटसर्किट होऊन आगीचे गोळे दीड एकर चाऱ्याच्या पिकावर पडले. या प्रकारामुळे भीषण आग लागल्याने शेतातील चारा, पीक व ठिबक सिंचन पाईप लाईन जळून खाक झाली. या संकटात शेतकऱ्याचे जवळपास ३ लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे सांगण्यात येत आहे.

या आगीची माहिती शेतकरी सोपान चंद्रकांत शिंदे यांनी लोहा न. प. चे नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांना दिली असता त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता ताबडतोब लोहा न. प. च्या अग्निशमन दलाची गाडी पाठवून आग विझवली. परंतु सध्या उन्हाळा असल्यामुळे व विद्युत तारेच्या शॉटसर्किटमुळे चारा संपूर्ण चारा जळाला.

या आगीत ठिबक सिंचनचा संच व पाईप लाईन जळाल्यामुळे सोपान चंद्रकांत शिंदे व गणेश प्रकाश शिंदे या शेतकऱ्यांचे जवळपास तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

या आगीचा पंचनामा लोहाचे तहसीलदार व महाराष्ट्र राज्य वीज महावितरण कंपनीच्या वरिष्ठांनी केली. यावेळी नुकसानभरपाई म्हणून आर्थिक मदत करावी, अशी मागणी आगपीडित शेतकरी सोपान चंद्रकांत शिंदे व गणेश प्रकाश शिंदे यांनी केली आहे.

यावेळी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन पीडित शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली. महसूल व म. रा. वि. महावितरण विभागाचे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी केली आहे.



**मुखेड –** मुखेड शहरासह तालुक्यातील आबादीनगर तांडा, वसूर तांडा, भवानी तांडा व इतर ठिकाणी पाणीटंचाईचे भीषण संकट दिसत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी महिला व युवती भटकंती करताना घेतलेले छायाचित्र. (छाया : हाफीजखान पठाण)

# भू-अलंकरण दिनानिमित्त संस्कार भारती नांदेडच्या कलाकारांनी साकारली सुंदर रांगोळी

**नांदेड (प्रतिनिधी)** –भूअलंकरण दिन व जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी नांदेड शहरात दोन ठिकाणी संस्कार भारतीच्या रांगोळी कलाकारांनी सुंदर व सुबक रांगोळी काढून भूमातेला अभिवादन केले. संस्कार भारतीच्या वतीने संपूर्ण देशभर याच पद्धतीची रांगोळी काढून आपल्या संस्कृतीची व ललित कलांची यानिमित्ताने देशवासीयांना ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

हनुमान पेठ (वजीराबाद) महावीर चौक व दत्त मंदिर लोकमित्र नगर डी. मार्ट रोड या दोन ठिकाणी दोन तास मेहनत घेऊन रांगोळी कलाकारांनी रांगोळी साकारली. रांगोळी पाहण्यासाठी दोन्ही ठिकाणी कलाप्रेमी रसिक नांदेडकरांनी उत्तम प्रतिसाद दिला.




ही रांगोळी साकारण्यासाठी सौ. अंजली कुलकर्णी, सौ. अंजली देशमुख, डॉ. सौ. वैशाली गोस्वामी, शोभाताई देशमुख, कु. गोदावरी जांगीलवाड, दीपक बिडकर व सौ. राधिका बिडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कलाकारांचा उत्साह वाढवण्यासाठी संस्कार भारती देवगिरी प्रांत महामंत्री डॉ. जगदीश देशमुख, कार्याध्यक्ष जयंत वाकोडकर, सौ. रजनी वाकोडकर, अमोल कंडारकर, सौ. कंडारकर आदी आवर्जून उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची 'प्रामाणिक कर्ज योजना'

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य सहकारी बँकेने इतर बँका व आर्थिक संस्था यांचेकडून कर्ज घेतलेल्या कर्जदारांना त्यांच्या बँकेच्या व्याजदरात १% सवलत देऊन त्यांचे कर्ज टेकओव्हर करण्यासाठी 'प्रामाणिक कर्ज योजना' सुरु केली आहे. सध्या कर्जदार ९४ प्रति वर्ष दराने व्याज देत असल्यास त्यास ८४ प्रतिवर्ष दराने कर्ज पुरवठा करण्यात येईल, मात्र किमान व्याजदर ७.५४ प्रतिवर्ष राहील, या योजनेत वैयक्तीक तसेच संस्थात्मक कर्जदार ज्यांचे कर्ज गेल्या ३ वर्षापासून स्टँडर्ड वर्गवारीत म्हणजे नियमित भरणा सुरु आहे अशा सर्व कर्जदारांना योजनेचा लाभ घेता येईल.

ही योजना दि.३० जूनपर्यंत सुरु राहणार असून, फक्त ३० दिवसात मंजुरी, सुलभ व जलद कर्ज पुरवठा, किमान कागदपत्र आवश्यकता, कोणतेही प्रोसेसिंग, व्हीजीट, स्क्रुटीनी वा अन्य छुपे शुल्क नाही, ही योजनेची वैशिष्ट्य आहेत. जास्तीत जास्त कर्जदारांनी योजनेचा लाभ घेऊन सध्या व्याजात १% सवलत प्राप्त करावी व अधिक माहितीसाठी बँकेचे प्रादेशिक कार्यालय, नांदेड व शाखा नांदेड वसंतनगर यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन बँकेतर्फे करण्यात येत आहे.

# आंबेडकरवादी लोकमंचच्यावतीने भीम जयंतीनिमित्त प्रबोधन महासभा

**नांदेड (प्रतिनिधी)** –आंबेडकरवादी लोकमंच नांदेडतर्फे भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती महोत्सव नांदेड शहरात येत्या रविवार, दि. २६ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये सायंकाळी ४ वाजता शंकरराव चव्हाण सभागृहात 'धर्मनिरपेक्ष भारताचे भवितव्य' या विषयावर मराठवाड्यातील ज्येष्ठ आंबेडकरवादी नेते सुरेश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली प्रबोधन महासभा आयोजित करण्यात आली आहे. या महासभेस नांदेड जिल्ह्याचे खा. प्रा. रविंद्र चव्हाण तसेच लोहा-कंधार तालुक्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे



यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या महासभेत राजधानी दिल्लीतील पत्रकार अशोक वानखेडे, मुंबईतील डॉ. आंबेडकर लॉ कॉलेजचे माजी प्राचार्य ॲड. जयमंगल धनराज, मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यकारिणी सदस्य ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती आंबेडकरवादी लोकमंचचे महासचिव प्रा. देविदास मनोहरे आणि पी. एस. गवळे यांनी या पत्रकाद्वारे दिली आहे.

यंदाचे वर्ष हे महाडच्या चवदार तळ्याच्या समता संगराच्या शताब्दीचे आहे. तसेच महात्मा ज्योतीबा फुले यांच्या द्विशताब्दीचेही आहे त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवात यावर्षी दलित- बहुजन समाजात मोठा जोश आणि चैतन्य संचारले आहे, असे आंबेडकरवादी लोकमंचचे संस्थापक अध्यक्ष सुरेश गायकवाड यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. या पत्रकार परिषदेस आंबेडकरवादी लोकमंचचे जनार्दन कवडे, नंदकुमार बनसोडे, प्रसेनजीत गायकवाड, ॲड. एम. जी. बादलगावकर, बबीताताई पोटफोडे, बाळू कदम, भगवान गायकवाड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# गोकुंदा येथे विधी सेवा समितीचे कायदेविषयक शिबीर उत्साहात

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुका विधी सेवा समिती, किनवटच्यावतीने गोकुंदा (ता. किनवट) येथील सु-संस्कार निवासी मतिमंद विद्यालयात कायदेविषयक जनजागृती शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरातून विद्यार्थी व पालकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश पी. एम. माने हे होते. यावेळी वकील संघाचे उपाध्यक्ष टी. आर. चव्हाण यांच्यासह सदस्य डी. जी. काळे, पी. पी. गावंडे, विलास शामीले, दीपा सोनकांबळे, पी. जी. घुले आणि बी. बी.




कानिंदे उपस्थित होते.शिबिरात ॲड. सोनकांबळे यांनी विद्यार्थी व पालकांना विविध कायदे, हक्क आणि शासकीय सुविधा याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. विशेषतः दिव्यांग विद्यार्थ्यांचे हक्क, शिक्षण व संरक्षण यावर त्यांनी प्रकाश टाकला.

यावेळी विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले, तर उपस्थित पालकांसाठी मिष्ठान्न भोजनाची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक वायकुळे यांच्यासह शिंदे, डहाके, अस्वले यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांना शिक्षकेत्तर कर्मचारी श्रीमती जाधव, मनोहरे, ढगे, आईटवार, अमृते, बिरादार, कदम आणि पांढरे यांनीही सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तोडकर यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक वायकुळे यांनी मानले.

# राज्य सहकारी बँकेचा माजी सेवकांसाठी संवेदनशील निर्णय

## गंभीर आजारांच्या उपचारांसाठी दरमहा ५ हजारपर्यंत आर्थिक मदत तर माजी सेवक आरोग्य आधार योजना लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने मानवी दृष्टीकोनातून आपल्या हयात असलेल्या सर्व माजी सेवकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी संवेदनशील निर्णय घेतला आहे. बँकेत निष्ठेने व प्रामाणिकपणे सेवा बजावलेल्या निवृत्त सेवकांना वृद्धापकाळात उद्भवणाऱ्या गंभीर आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक मदत मिळावी यासाठी राज्य बँक माजी सेवक आधार योजना लागू करण्यास दि.१६ एप्रिलच्या प्रशासकीय सभेत मान्यता देण्यात आली आहे.

वृद्धापकाळात कर्करोग, मुत्रपिंड निकामी होणे, मेंदूचा पक्षघात, यकृत निकामी होणे, पार्किन्सस, क्षयरोग आदी गंभीर आजारांवर दीर्घकालीन व खर्चिक उपचार करावे लागतात. सेवानिवृत्तीनंतर उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित असल्याने अशा उपचारांचा आर्थिक भार मोठा ठरतो. ही बाब लक्षात घेऊन बँकेने ही योजना आपल्या माजी सेवकांना लागू केली आहे.

या योजनेअंतर्गत गंभीर आजार असलेल्या पात्र माजी सेवकांना सेवक कल्याण निधीतून दरमहा ५ हजार रुपये इतके आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या मदतीमुळे निवृत्त सेवकांना औषधोपचारासाठी आवश्यक आर्थिक आधार मिळणार असून, बँकेची कर्मचारी हिताची परंपरा अधिक बळकट होणार आहे.

बँकेच्या सामाजिक बांधीलकीचा भाग म्हणून हा उपक्रम राबविण्यात येत असून, माजी सेवकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी बँकेचा हा पुढाकार अत्यंत महत्वपूर्ण मानला जात आहे.

या व्यतिरिक्त माजी सेवकांना त्यांच्यावरील शस्त्रक्रियेपोटी येणाऱ्या खर्चासाठी बँक पूर्वीपासून आर्थिक सहाय्य करीत असून, आरोग्य आधार योजने व्यतिरिक्त शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहाय्य करण्याची योजना पूर्वीप्रमाणेच पुढे चालू राहणार आहे.

या संदर्भात गरजू माजी सेवकांना बँकेच्या मुंबई येथील कार्यालयाशी अथवा राज्यातील बँकेच्या सर्व विभागीय कार्यालयांशी संपर्क करावा, असे आवाहन बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी केले आहे.

# केंद्रीय विद्यालय विभागीय आर्चरी स्पर्धेत अनिकेत नागरगोजेला सुवर्णपदक



**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्रीय विद्यालयाच्यावतीने पुणे येथे आयोजित विभागीय स्पर्धेत नांदेड केंद्रीय विद्यालयाचा विद्यार्थी अनिकेत नागरगोजे याने दमदार कामगिरी करीत सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

केंद्रीय विद्यालयाच्या मुंबई विभागाच्या वतीने पुणे येथे १४, १७ व १९ या वयोगटातील विभागीय आर्चरी स्पर्धा दि. २२ एप्रिल २०२६ रोजी पार पडली. त्यात रिकर्व्ह प्रकारात अनिकेत ज्ञानोबा नागरगोजे याने उत्कृष्ट कामगिरी करीत सुवर्णपदक प्राप्त केले. अनिकेतने आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक अमोल बोरीवाले यांना दिले आहे. अनिकेतच्या यशाबद्दल केंद्रीय विद्यालय नांदेडचे प्राचार्य अशोक कुमार विश्वकर्मा, मुख्याध्यापक राम, क्रीडा शिक्षक दीपक कुमार, प्रशांत यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# नव्या पिढीला इतिहासाची जाणीव करून देण्यासाठी महापालिकेचा पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा मुक्ती संग्रामात प्राणपणाने लढलेल्या असंख्य योद्ध्यांच्या शौर्यकथा आणि त्याग नव्या पिढीपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. या ऐतिहासिक लढ्याची खरी ओळख आजच्या तरुणांना व्हावी, यासाठी नांदेड वाघाळा महानगरपालिका स्वतंत्र आणि व्यापक कार्यक्रम राबविणार असल्याची घोषणा महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केली.

सीमा भागातील समन्वयकांशी आयोजित संवाद कार्यक्रमात बोलताना डोईफोडे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ एक इतिहासाचा भाग नाही, तर तो आपल्या स्वातंत्र्याचा पाया आहे. मात्र दुर्दैवाने आजच्या नव्या पिढीला या संग्रामाची सखोल माहिती नाही. हा लढा कसा लढला गेला, किती बलिदान दिले गेले आणि आपण आज जे स्वातंत्र्य उपभोगत आहोत ते कोणाच्या कष्टामुळे मिळाले याची जाणीव निर्माण होणे अत्यावश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, दरवर्षी १७ सप्टेंबरला औपचारिक कार्यक्रम घेऊन समाधान मानणे पुरेसे नाही. इतिहास केवळ स्मरणात ठेवण्याचा विषय नसून तो सतत जागृत ठेवण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे यावर्षी १७ सप्टेंबरची वाट न पाहता, नागरिकांच्या सहभागातून विविध उपक्रम, व्याख्याने, प्रदर्शन, शौर्यगाथा कथन आणि युवकांसाठी विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमामागील संकल्पना आणि अंमलबजावणीबाबत सीमावर्ती भागातील प्रमुख समन्वयक गोविंद मुंडकर यांनी सविस्तर मांडणी केली. त्यांनी सांगितले की, मराठवाडा मुक्ती संग्राम हा जनतेच्या एकजुटीचा आणि अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या सामूहिक शक्तीचा जिवंत पुरावा आहे. हा इतिहास केवळ पुस्तकात न राहता लोकांच्या मनात जिवंत राहायला हवा. त्यासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी कार्यक्रम राबवणे ही काळाची गरज आहे.

या प्रस्तावित कार्यक्रमांमुळे तरुण पिढीला इतिहासाशी जोडण्यासोबतच सामाजिक जाणीवही निर्माण होणार आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमात विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित केला जाणार आहे.

एकूणच, नांदेड वाघाळा महानगरपालिकेचा हा पुढाकार केवळ एक कार्यक्रम नसून इतिहासाला नव्याने उजाळा देण्याचा आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांची पुनर्स्थापना करण्याचा ठोस प्रयत्न ठरणार आहे.

# अंतर्मन

## घराचा मुख्य दरवाजा कोणत्या दिशेला असावा?

### मुख्य दरवाजाशी संबंधित महत्त्वाचे नियम जाणून घ्या...



**वास्तुशास्त्रामध्ये मुख्य दरवाजाला खूप महत्त्वाचे मानले जाते. त्याचे योग्य स्थान आणि दिशा आवश्यक आहे. कारण मुख्य दरवाजातूनच घरात सकारात्मक ऊर्जा प्रवेश करते. शिवाय ज्योतिषशास्त्रानुसार, देवी लक्ष्मी देखील मुख्य दरवाजातूनच प्रवेश करते. अशा परिस्थितीत वास्तू दोष टाळण्यासाठी आणि घरात सकारात्मकता आणण्यासाठी, मुख्य दरवाजा बांधताना काही वास्तू तत्त्वे आणि नियम लक्षात ठेवले पाहिजेत. याव्यतिरिक्त सभोवतालचा परिसर देखील घर आणि कुटुंबातील सदस्यांवर परिणाम करतो आणि वास्तू दोष निर्माण करू शकतो. चला, मुख्य दरवाजा कोणत्या दिशेला असावा आणि त्याच्याशी संबंधित महत्त्वाची वास्तू तत्त्वे सविस्तरपणे जाणून घेऊया...**

### वास्तुशास्त्रानुसार मुख्य दरवाजाची दिशा

वास्तुशास्त्रानुसार, घराचा मुख्य दरवाजा उत्तर दिशेला असावा. जर हे शक्य नसेल, तर तुम्ही मुख्य दरवाजा पूर्व किंवा ईशान्य दिशेला देखील बांधू शकता. या दिशा मुख्य दरवाजासाठी सर्वोत्तम मानल्या जातात. वास्तू गुरू सुचवतात की मुख्य दरवाजा उत्तरेला ५ अंश ते ३४६ अंश, पूर्वेला ९० अंश, दक्षिणेला १८० अंश आणि पश्चिमेला २७० अंश या दरम्यान असावा. याचा कुटुंबावरही सकारात्मक परिणाम होतो.

### मुख्य दरवाजासाठी इतर महत्त्वाच्या सूचना...

» तुमच्या घराचा मुख्य दरवाजा बांधताना, प्रार्थना कक्ष थेट त्याच्या समोर नसेल याची खात्री करा. हे अशुभ मानले जाते.

» स्वयंपाकघर कधीही थेट मुख्य दरवाजासमोर बांधू नये. शिवाय, मुख्य दरवाजासमोर थेट चूल असणे अशुभ मानले जाते.

» वास्तुशास्त्रानुसार, मुख्य दरवाजा कधीही शौचालय किंवा स्नानगृहासमोर बांधू नये. हे अशुभ मानले जाते. शिवाय, मुख्य दरवाजासमोर जिना ठेवू नये.



### मुख्य दरवाजाशी संबंधित वास्तू नियम...

» मुख्य दरवाजाजवळ कोणताही कचरा किंवा भंगार ठेवू नये. असे केल्याने घरातील वातावरणावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

» असे मानले जाते की, मुख्य दरवाजाजवळ जड वस्तू चुकूनही ठेवू नयेत. शिवाय, दरवाजाच्या मागे, मुख्य दरवाजाकडे जाणाऱ्या मार्गात किंवा त्याच्या आजूबाजूला कोणत्याही जड वस्तू ठेवणे टाळावे.

» वास्तुशास्त्रानुसार, मुख्य दरवाजासमोर थेट विजेचा खांब किंवा इतर कोणताही स्तंभ नसावा. शिवाय, जवळ मोठे झाड असणे देखील अशुभ मानले जाते. यामुळे घरात सकारात्मक ऊर्जेच्या प्रवेशात अडथळा येऊ शकतो.

» घराचा मुख्य दरवाजा रस्त्याच्या टी-पॉइंटवर कधीही नसावा याची विशेष काळजी घ्यावी. अशा ठिकाणी खूप उच्च आणि थेट ऊर्जा असते, जी घरातील शांततेवर प्रतिकूल परिणाम करू शकते.


» मुख्य दरवाजा गटारे, नाले किंवा जिथे घाणेरडे पाणी साचते अशा ठिकाणी समोर किंवा जवळ बांधू नये. अशा ठिकाणी मुख्य दरवाजा असल्यामुळे सकारात्मक ऊर्जा आत येण्यास अडथळा येतो.

» तुम्ही मुख्य दरवाजाजवळ तुळस आणि मनी प्लांटसारखी शुभ आणि सुंदर रोपे लावू शकता. शिवाय, मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूंच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. यामुळे सकारात्मक ऊर्जा आकर्षित होते.

» घराच्या मुख्य दरवाजावर सोनेरी रंगाचा दिवा लावणे शुभ मानले जाते. यामुळे सकारात्मक वातावरण टिकून राहते. शिवाय, मुख्य दरवाजा संध्याकाळी कधीही अंधारात ठेवू नये.

» वास्तु गुरू मान्या यांच्या मते, मुख्य दरवाजा बांधताना, त्याच्या थेट समोर आरसा नसेल याची खात्री करा. यामुळे सकारात्मक ऊर्जा काचेवरून परावर्तित होऊन बाहेर जाऊ शकते.

» मुख्य प्रवेशद्वारावर दुपत्री दरवाजा बसवणे सर्वात शुभ मानले जाते. सुखद वातावरण टिकवून ठेवण्यासाठी तुम्ही दरवाजाजवळ धूपही जाळू शकता. मुख्य दरवाजा बांधताना, तो घड्याळाच्या काट्याच्या दिशेने उघडेल याची खात्री करा.



## सासू-सुनेत नेहमीच मतभेद?

### या नात्यात गोडवा आणण्याचे जाणून घ्या उपाय !; वास्तू गुरू काय म्हणतात...



**सासू- सुनेचे नाते गोड-कडू अनुभवांनी भरलेले असते. हे नाते प्रेम आणि संघर्षाचे मिश्रण आहे. जर सासू आणि सून प्रत्येक लहानसहान गोष्टीवरून भांडत असतील, तर घरात नकारात्मक ऊर्जा राहते आणि कुटुंबातील इतर सदस्यांनाही समस्यांना सामोरे जावे लागते. जर सासू आणि सुनेच्या नात्यात खूप मतभेद असतील, तर तुम्ही काही सोपे वास्तु उपाय अवलंबून ते सुधारू शकता. चला, सासू आणि सुनेचे नाते सुधारण्यासाठी काही वास्तु टिप्स जाणून घेऊया...**

### सासू आणि सुनेचे नाते सुधारण्यासाठी वास्तु टिप्स

» वास्तु गुरू मान्या सुचवतात की, जर सासू आणि सुनेच्या नात्यात वारंवार भांडणे आणि वाद होत असतील, तर तुमच्या स्वयंपाकघराची दिशा तपासा. वास्तुशास्त्रानुसार, स्वयंपाकघर घराच्या ईशान्य दिशेला, म्हणजेच ईशान्य कोपऱ्यात नसावे. ईशान्य कोपऱ्यात स्वयंपाकघर असणे हा एक वास्तुदोष मानला जातो. हे देखील सासू आणि सुनेमधील वादाचे कारण असू शकते. जर तुम्ही तुमच्या स्वयंपाकघरात बदल करू शकत नसाल, तर अग्नी तत्त्व संतुलित करण्यासाठी तुमच्या स्टोव्हखाली एक पिवळा जैसलमेर दगड ठेवा.

» जर घराची आग्नेय दिशा खूप उष्ण राहत असेल किंवा तिथे संतुलन नसेल, तर घरातील स्त्रियांमध्ये सतत संघर्ष आणि तणाव निर्माण होतो. अशा परिस्थितीत, तुम्ही हा भाग फिकट लाल किंवा नारंगी रंगाने रंगवावा.

» वास्तूशास्त्रानुसार आग्नेय दिशादेखील महत्त्वाची दिशा मानली जाते. जर ही दिशा विचलित झाली, तर व्यक्तीला तणाव आणि चिंता जाणवते. शिवाय, व्यक्तीचे मन सतत अस्वस्थ राहते. ही दिशा संतुलित ठेवण्यासाठी या ठिकाणी निळा, काळा, फिकट क्रीम किंवा हिरव्या रंगाचा वापर करा.

» सासू आणि सुनेचे संबंध सुधारण्यासाठी आणि त्यांच्यात सलोखा टिकवून ठेवण्यासाठी सुनेने आपल्या सासूला चांदीचे पैंजण भेट द्यावे. चांदी हे चंद्राचे प्रतीक मानले जाते आणि ते नात्यात शांतता टिकवून ठेवते.

» याव्यतिरिक्त, जर मुलगा आणि सुनेची खोली आग्नेय दिशेला असेल, तर त्यांनी भाताचे सेवन करावे. यामुळे नात्यात सुसंवाद निर्माण होतो. कारण, वास्तूनुसार, आग्नेय दिशा ही आक्रमकतेची दिशा मानली जाते.

» जर सासू आणि सुनेमध्ये वारंवार वाद होत असतील, तर सुनेने आपल्या सासूच्या हातातून थोडे तांदूळ घेऊन ते आपल्या खोलीच्या उत्तर दिशेला ठेवावेत. असे केल्याने तुम्हाला तुमच्या सासूचा आशीर्वाद मिळतो आणि घरात शांतता नांदते. शिवाय, तुमच्या सासूचा आशीर्वाद कायम राहतो आणि शांतता टिकून राहते.

» नात्यांमध्ये पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी तुमच्या घराचा ईशान्य कोपरा नेहमी स्वच्छ ठेवा. शिवाय, वास्तूनुसार, सासू आणि सासऱ्यांची खोली नैऋत्य दिशेला असावी. ही दिशा नात्यांमध्ये स्थिरता आणते.

» वास्तूशास्त्रानुसार, कौटुंबिक फोटो नैऋत्य दिशेला ठेवावेत. असे केल्याने कुटुंबातील सर्व सदस्यांमधील नातेसंबंध अधिक दृढ होतात.

» वास्तूनुसार, घरात काटेरी झाडे लावणे टाळावे. त्याऐवजी बांबू किंवा तुळस लावावी.

» तुमच्या स्वयंपाकघरात काळ्या रंगाच्या फरशा आणि काळे दगड वापरणे टाळा, कारण काळा रंग नकारात्मकता आणतो, ज्यामुळे नातेसंबंधांवरही परिणाम होऊ शकतो.

## काल सर्प दोषावरील उपाय; अडचणी अन् आर्थिक आव्हानांपासून मुक्ती !

ज्योतिषशास्त्रानुसार काल सर्प दोष हा एक अत्यंत अशुभ आणि विनाशकारी योग मानला जातो. कुंडलीत राहू आणि केतूच्या मध्ये सर्व सात ग्रह (सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरू, शुक्र आणि शनी) असण्यामुळे कालसर्प दोष निर्माण होतो. कालसर्प दोष ग्रहांच्या अंशांवर आणि राहू व केतू यांच्यातील अंतरावर अवलंबून असतो. याचा परिणाम व्यक्तीवर ४२ वर्षांपर्यंत होऊ शकतो. जेव्हा एखादा ग्रह राहू आणि केतूच्या मधून दुसऱ्या बाजूला जातो, तेव्हा त्याला अर्ध कालसर्प दोष म्हणतात. या प्रभावामुळे व्यक्तीला जीवनात अचानक अडचणी आणि आर्थिक आव्हानांना सामोरे जावे लागते. कामातील सततचे अडथळे आणि अपयश ही कालसर्प दोषाची लक्षणे आहेत. काही ज्योतिषीय उपायांनी त्याचे परिणाम कमी केले जाऊ शकतात...

### कालसर्प दोषाचे प्रकार

कालसर्प दोषाचे १२ प्रकार आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या कालसर्प दोषांसाठी वेगवेगळे उपाय वापरले जातात. यामध्ये अनंत काल सर्प दोष, शेषनाग काल सर्प दोष, कर्कोटक काल सर्प दोष, कुलिक काल सर्प दोष, वासुकी काल सर्प दोष, शंखपाल काल सर्प दोष, पद्म काल सर्प दोष, महापद्म काल सर्प दोष, तक्षक काल सर्प दोष, शंखचूड काल सर्प दोष, घातक काल सर्प दोष, विषधर काल सर्प दोष यांचा समावेश आहे. यापैकी महापद्म काल सर्प दोष हा सर्वात अशुभ मानला जातो.

### काल सर्प दोषाचे उपाय

» काल सर्प दोषाचा प्रभाव कमी करण्यासाठी भगवान शिवाला रुद्राभिषेक करावा. तुम्ही दूध, मध, उसाचा रस आणि तेलाने अभिषेक करू शकता. नियमितपणे 'ॐ नमः शिवाय' मंत्राचा जप करा.

» कालसर्प दोषाने ग्रस्त असलेल्यांनी शक्य असेल तेव्हा मंदिराची स्वच्छता करावी. नागपंचमीला शिवलिंगाला दूध आणि चांदीचा सर्प अर्पण करा. यामुळे कालसर्प दोषाचा प्रभाव कमी होतो.

» कालसर्प दोषाने ग्रस्त असलेल्यांना सोमवारी उपवास केल्यानेही आराम मिळतो. कालसर्प दोषाचा प्रभाव कमी करण्यासाठी, राहू आणि केतूचे मंत्र, 'ॐ राहवे नमः' आणि 'ॐ केतवे नमः' यांचा नियमितपणे जप करा. दररोज हनुमान चालीसा आणि महामृत्युंजय मंत्राचे पठण केल्याने कालसर्प दोषाचा प्रभाव कमी होतो.

## भगवान विष्णूने देवी लक्ष्मीला दिले वरदान

### नाव पडले बद्रीनाथ, जाणून घ्या बद्रीनाथची कथा...

**बद्रीनाथ धाम हे पृथ्वीवरील स्वर्ग आहे. असे म्हटले जाते की जो कोणी बद्रीनाथला भेट देतो त्याला मोक्ष मिळतो आणि तो जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त होतो. बद्रीनाथ हे भगवान विष्णूचे निवासस्थान आहे, पण तुम्हाला माहित आहे का की बद्रीनाथ हे नाव भगवान विष्णूच्या नावावरून नाही, तर देवी लक्ष्मीच्या नावावरून ठेवण्यात आले आहे ? हे ठिकाण इतके महत्त्वाचे का आहे ? तुम्हाला माहित आहे का की या ठिकाणी केवळ भगवान विष्णूचीच नव्हे, तर देवी लक्ष्मीचीही पूजा केली जाते. चला, बद्रीनाथची कथा जाणून घेऊया...**

### बद्रीनाथ हे नाव कसे मिळाले?



एकेकाळी भगवान विष्णू योगनिद्रा अवस्थेत होते. त्यावेळी मुसळधार बर्फवृष्टी होत होती. भगवान विष्णू ध्यान करत राहिल्याने, ते बर्फाने पूर्णपणे झाकले गेले. त्यांची अवस्था पाहून देवी लक्ष्मी खूप दुःखी झाल्या. देवी लक्ष्मी भगवान विष्णूकडे गेल्या आणि त्यांनी बद्री नावाच्या बोरीच्या झाडाचे रूप धारण केले. या रूपात, देवी लक्ष्मीने अनेक वर्षे भगवान विष्णूचे रक्षण केले आणि त्यांच्या दुःखात त्यांना साथ दिली. जेव्हा भगवान विष्णू ध्यानातून बाहेर आले आणि त्यांनी डोळे उघडले, तेव्हा त्यांना देवी लक्ष्मी बद्री वृक्षाच्या रूपात, पूर्णपणे बर्फाने झाकलेल्या अवस्थेत विराजमान दिसल्या. हे पाहून भगवान विष्णू खूप प्रसन्न झाले आणि देवी लक्ष्मीला म्हणाले, तू माझे रक्षण केलेस आणि मला माझे ध्यान पूर्ण करण्यास मदत केलीस, म्हणून आजपासून हे ठिकाण बद्रीनाथ म्हणून ओळखले जाईल. या धामात माझ्यासोबत तुझीही पूजा केली जाईल. ज्या तलावात भगवान विष्णूंनी तपश्चर्या केली होती, तो आजही अस्तित्वात आहे. असे म्हटले जाते की या तलावातील पाणी सर्व ऋतूंमध्ये उबदार राहते.

### बद्रीनाथमधील तप्त कुंडाचे रहस्य

बद्रीनाथमध्ये असलेला हा तलाव तप्त कुंड म्हणून ओळखला जातो. अत्यंत थंडीतही या तलावातील पाणी अत्यंत उबदार राहते. अनेक पौराणिक कथा आणि श्रद्धांनुसार, भगवान विष्णूंनी अग्निदेवांना आशीर्वाद दिला होता की ते या तलावात कायमचे वास्तव्य करतील. सध्या, बद्रीनाथला भेट देणारे भाविक या तलावात स्नान करतात.

## अशा लोकांत सूक्ष्म जग पाहण्याची अद्भूत क्षमता !



**सहावे इंद्रिय धोक्याची सूचना देते किंवा अनपेक्षित घटनेची पूर्वसूचना देते. सहावे इंद्रिय ही निसर्गाची देणगी मानली जाते, एक अशी क्षमता जी आपल्याला अलौकिक जगातील अशी माहिती मिळवण्यास मदत करते जी मानवांना जाणवत नाही. आपण आपल्या पाच इंद्रियांकडून मिळणाऱ्या माहितीत इतके मग्न होतो की सहावे इंद्रिय अस्तित्वात आहे हे आपल्या लक्षातच येत नाही.**

सहाव्या इंद्रियाला अनेकदा एक गूढ शक्ती म्हटले जाते; तिच्या साक्षात्काराला अंतर्दृष्टी किंवा अंतरात्म्याचा आवाज असेही म्हटले जाते. असे अनेक लोक आहेत ज्यांच्यामध्ये अगदी लहान वयातही सूक्ष्म जग जाणण्याची किंवा समजण्याची क्षमता असते. मानव केवळ त्याच गोष्टी स्वीकारतो ज्या वैज्ञानिकदृष्ट्या समजून घेतल्या जाऊ शकतात किंवा स्पष्ट केल्या जाऊ शकतात. गूढ ज्ञान आणि विज्ञानाला न समजणारे विषय अनेकदा नाकारले जातात किंवा अस्तित्वात नाहीत असे म्हणून फेटाळले जातात. या आधारावर विज्ञान आत्मा, देव, भूत, राक्षस, पुनर्जन्म, मानवी जीवनावरील ग्रह आणि ताऱ्यांचा प्रभाव इत्यादी संकल्पना पूर्णपणे स्वीकारत नाही. वास्तविक पाहता, भौतिक इंद्रियांची रचना अशा प्रकारे केली आहे की ती केवळ भौतिक जगच जाणू शकतात; दुसऱ्याच्या मनात काय चालले आहे हे ती जाणू शकत नाहीत. पाच इंद्रिये मानवी मनात निर्माण होणाऱ्या विचारांच्या प्रतिमा जाणू शकत नाहीत किंवा आत्म्यातून निघणाऱ्या कंपनांना अनुभवू शकत नाहीत. विज्ञानाची वास्तविकता भौतिक जगापुरती मर्यादित आहे, तर अनेक मानसशास्त्रज्ञ



आणि अध्यात्मवाद्यांनी भौतिक जगाच्या पलीकडील सूक्ष्म जग आणि अलौकिक जग समजून घेण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सहावे इंद्रिय किंवा अंतर्ज्ञान देखील मानवांना अज्ञात गोष्टी समजून घेण्यास आणि क्षणात निर्णय घेण्यास मदत करते. सूक्ष्म जग आपल्या सभोवताली अस्तित्वात आहे, जे आपण आपल्या भौतिक इंद्रियांनी जाणू शकत नाही. हे सूक्ष्म जग आपल्या जीवनावर प्रभाव टाकते. सिद्धी (शक्ती) प्राप्त करण्यासाठी किंवा सूक्ष्म जगाची रहस्ये समजून घेण्यासाठी आध्यात्मिक साधना आणि ध्यान आवश्यक आहे. जशी साधकाची आध्यात्मिक पातळी वाढते, तसतशा सूक्ष्म जगाच्या अदृश्य शक्ती त्यांच्याशी संवाद साधू लागतात आणि त्यांना मदत करतात. दैवी शक्ती आपल्या सभोवताली सर्वत्र उपस्थित आहे, परंतु आध्यात्मिक साधना किंवा सहावे इंद्रिय जागृत केल्याशिवाय तिच्या दिव्यत्वाचा अनुभव घेता येत नाही.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७९१९०१, ९८६०७२१३५६

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# दिशा समितीच्या बैठकीत जलजीवन मिशन, महावितरण, रस्ते विकासासह विविध महत्त्वाच्या विकास कामांचा आढावा; काही अधिकाऱ्यांना तंबी

**नांदेड (प्रतिनिधी)** -जिल्ह्यातील विविध विकास योजना तसेच विकास कामांबाबत जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीच्या (दिशा) बैठकीत सर्वंकष आढावा घेण्यात आला. विकास योजना, उद्दीष्टांच्या अंमलबजावणीसाठी विविध विभागांकडून काटेकोर नियोजन करण्यात यावेत, असे निर्देश दिशा समितीचे अध्यक्ष तथा खासदार रविंद्र चव्हाण यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन येथे गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी दिशा समितीची बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.



यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खा. नागेश पाटील आष्टीकर, खा. शिवाजी काळगे, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. बाबुराव कोहळीकर, आ. आनंदराव तिडके, आ. श्रीजया चव्हाण, महापौर कविता मुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, लोहा व भोकरचे नगराध्यक्ष यांच्यासह विविध विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

या बैठकीत सुरवातीला २४ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली. जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीच्या विविध योजनेच्या कामाचा विस्तृत आढावा घेण्यात आला.

प्रत्येक विभागाने बैठक झाल्यानंतर अनुपालन अहवाल समितीला सादर केला पाहिजे अशा सूचना खा. रविंद्र चव्हाण यांनी सुरवातीला सर्व विभागांना केल्या. त्यानंतर जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या पूर्ण, अपूर्ण कामांबाबतची यादी सादर करणे, स्त्रोत नाही तिथे काम झाले का, निधीचा प्रश्न, आतापर्यंत किती कामे पूर्ण झाली याबाबत खा. अशोकराव चव्हाण यांनी विचारणा केली. याबाबत जलजीवन मिशन योजनेबाबतचा प्रश्न लवकरच मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबतच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. जिल्ह्यात व शहरात सध्या महावितरणच्या अनेक समस्यांबाबत सर्वच लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे लक्ष वेधले. लोडशेडींगसह अचानक वीज गायब होण्याच्या घटनेने नागरिक त्रस्त असून, याबाबत महावितरणने कायमस्वरुपी समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना कराव्यात. तसेच येत्या ५ वर्षाच्या कालावधीत शहरात सर्व केबल अंडरग्राऊड करण्याचे काम पूर्ण व्हावे अशा सूचना खा. रविंद्र चव्हाण यांनी दिल्या.

विजेच्या समस्या सोडविण्याबाबत तरोडा भागात ८ नवे ट्रान्सफार्मर बसविले असून, इतर भागातही ट्रान्सफार्मर बसविण्याची कार्यवाही सुरू असल्याचे महावितरण विभागाकडून सांगण्यात आले. यासह इतरही समस्या लवकरच सोडविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात येईल व सर्व समस्यांवर उपाययोजना करण्यात येईल, असे महावितरणचे अधीक्षक अभियंता विनय घनबहादूर यांनी सांगितले. यावर्षी नांदेड जिल्ह्याला प्रधानमंत्री पीक विमा योजनेत ८१३ कोटी रुपयांचा पिकविमा परतावा मंजूर झाला आहे. याबाबत जिल्हाधिकारी व कृषी विभागाचे यावेळी अभिनंदन केले. खताचे लिंकींग, भरारी पथके, खताचा तुटवडा होऊ नये यासाठी खबरदारी, खताचा पुरेसा साठा, युरियाचा पुरवठा, मागणी प्रमाणे उपलब्धता, विक्री या विविध विषयांचा यावेळी आढावा घेण्यात आला. लिंकींगमुळे शेतकऱ्यांना खताच्या बाबतीत त्रास होऊ नये याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना कृषी विभागाला दिल्या.

शहराला दैनंदिन पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, अमृत मिशन २ यांसह विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. नुकतेच इस्लामपुरा भागात चार शाळकरी मुलांचा खड्ड्यात पडून मृत्यू झाला. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती खा. रविंद्र चव्हाण यांनी महापालिकेकडून घेतली. या मृत्त मुलांना योग्य ती मदत मिळेल याची काळजी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

महामार्गाच्या पायाभूत सुविधा, दूरसंचार पायाभूत सुविधा कार्यक्रम, राष्ट्रीय महामार्ग, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, अमृत मिशन २.०, पाटबंधारे, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पीएम सूर्यघर योजना, रेल्वे विभाग यांसह सर्व योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. अध्यक्ष खा. रविंद्र चव्हाण यांनी नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी व विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित यंत्रणेने त्वरित कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले. या शिवाय आवश्यकतेनुसार महत्वाच्या विभागांचा आढावा स्वतंत्र बैठक घेवून घेण्यात येईल अशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

बारूळ धरण सिमेंट कॅनालचे बांधकाम सुरू असून, संबंधित बांधकाम करत असताना नवीन मुरूम ऐवजी बाजूच्या शेतातील माती काढून कॅनालचे बांधकाम चालू आहे. भविष्यात शेतीचे नुकसान होऊ नये याकरिता धानोरा, कांडाळा, होटाळा येथील शेतकऱ्याची उखरलेली जमीन भरून देण्यात यावी, असे खा. डॉ. काळगे यांनी सांगितले.

## सामुहिक विवाह सोहळ्यातून सामाजिक ऐक्य घट्ट होते - माजी खा. चंद्रकांत खैरे



**नांदेड (प्रतिनिधी)** –सामूहिक विवाह सोहळ्यातून सामाजिक ऐक्य घट्ट होते, सामाजिक एकोपा वाढून समाज एकजूट होण्यास मदत होते, असे प्रतिपादन माजी खा. चंद्रकांत खैरे यांनी नांदेड येथील संपन्न झालेल्या भव्य, अभूतपूर्व व ऐतिहासिक सामुहिक विवाह सोहळ्याला भेट दिल्यावर केले. सर्व वधू-वरांना आशीर्वाद दिल्यानंतर ते बोलत होते.

यावेळी नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर, मूर्तिजापूरचे आमदार हरिष पिंपळे, ढाणकीच्या नगराध्यक्षा अर्चना वासमवार यांची उपस्थिती होती. सामुहिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून समाजाचा वेळ व पैसा दोन्ही गोष्टींची बचत होते व समाजाची आर्थिक उन्नती होते, असे प्रतिपादन आ. हरीष पिंपळे यांनी केले. नांदेड जिल्हा बुरुड समाज संघटना ही महाष्ट्रातील उपक्रमशील संघटना असून, त्याचे श्रेय अध्यक्ष मोहनराव पटकोटवार व सरचिटणीस संजय हळदे व त्यांच्या टीमला जाते असे जाहीरपणे सांगितले.

या मेळाव्यामध्ये १० जोडपी विवाहबद्ध झाली. महाराष्ट्र, तेलंगना, मध्य प्रदेश व कर्नाटक या राज्यातील बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते. यावेळी अनेक समाज बांधवांनी जोडप्यांना विविध भेट वस्तू देऊन आशीर्वाद दिले. या मेळाव्याची अन्न सेवा प्रसिद्ध व्यापारी बालाजीराव नागेश्वर, युवा नेते सचिन पेंढारकर व उदगीर बुरुड समाजाने केली होती. तर जलसेवा शिवाजी पोतुलवार, हणमंत सुनेवाड, मुन्ना गुळवे यांनी दिली.

यावेळी समाजाचे मार्गदर्शक बंडुजी गयनेवार, भिकाजीराव सूर्यवंशी यांची उपस्थिती होती. हा मेळावा यशस्वीतेसाठी नांदेड जिल्हा बुरुड समाज महिला संघटना अध्यक्षा मनीषाताई नागेश्वर, मंगलताई गुडमलवार, युवा अध्यक्ष साईदास नागेश्वर, मनीष जोरगेवार, सचिन नागेश्वर, संघटनेचे उपाध्यक्ष साईनाथ गुडमलवार, आनंद गुडमलवार, मोहनराव वासमवार, कैलाश मुखेडकर, बाबुराव गुडमलवार, सायन्ना वडे साहेब, शिवाजीराव नागेश्वर, शिवाजीराव गुडमलवार, विजय नागेश्वर, किरण नागेश्वर, बालासाहेब नागेश्वर, व्यंकट नागेश्वर, गणेशराव गुडमलवार यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

## घरकुल योजनेच्या कामात दिरंगाई नको; महापौरांचे आढावा बैठकीत निर्देश



**नांदेड (प्रतिनिधी)** –पंतप्रधान आवास योजना आणि रमाई आवास योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना तात्काळ घरकुले उपलब्ध करून देण्यात यावीत. तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित असलेल्या कामांचा निपटारा करून सर्वसामान्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करावे, असे निर्देश नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे यांनी गुरुवारी झालेल्या आढावा बैठकीत प्रशासनाला दिले.

महानगरपालिकेच्या मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत महापौर मुळे यांनी शहरातील घरकुल योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. याप्रसंगी उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, नगरसेवक उमेश चव्हाण, अभिषेक सौदे, नगरसेवक प्रतिनिधी किशोर भवरे, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त नितीन गाढवे, घरकुल विभागप्रमुख प्रकाश कांबळे, उपअभियंता हफिजउल्ला खान आदी उपस्थित होते.

शहरातील प्रधानमंत्री आवास योजना आणि रमाई आवास योजनेंतर्गत मंजुरी मिळूनही अपूर्ण असलेल्या घरकुलांची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. ज्या लाभार्थ्यांच्या घरांचे टप्पे पूर्ण झाले आहेत, त्यांना पुढील हप्ते वेळेवर मिळावेत जेणेकरून बांधकामे रखडणार नाहीत याची दक्षता घेण्याचे आदेश महापौरांनी दिले. तसेच नवीन लाभार्थी नोंदणी आणि प्रलंबित अर्जांची पडताळणी करून तातडीने पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

घरांच्या बांधकामात गुणवत्तेशी कोणतीही तडजोड करू नका आणि योजनेत पूर्ण पारदर्शकता ठेवावी, असे महापौरांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे घरकुल मंजूर करण्यासाठी कोणत्याही दलालास बळी न पडता आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी आपल्या प्रभागातील नगरसेवक, महापौर व इतर पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन यावेळी महापौरांनी केले.

## शिक्षण सेवकांचा नांदेडमध्ये आज 'कॅंडल मार्च'

**नांदेड (प्रतिनिधी)** –शिक्षण सेवक म्हणून रूजू असताना अकाली निधन झालेल्या राज्यातील शिक्षण सेवकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता नांदेडमध्ये महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासमोर शिक्षण सेवक कृती समिती नांदेडच्यावतीने कॅण्डल मार्चचे आयोजन करण्यात आले आहे.

नियमित शिक्षकांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या शिक्षण सेवकांना सेवा कालावधीत कोणतीही सुरक्षा मिळत नाही. शिक्षण सेवकांचा मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंब उघड्यावर पडते, ही मोठी शोकांतिका आहे. शिक्षण सेवकांच्या प्रश्नांबाबत शासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे शासनाने शिक्षण सेवकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना न्याय द्यावा यासह शिक्षण सेवकांच्या विविध मागण्यांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिक्षण सेवक कृती समितीच्यावतीने हा कॅण्डल मार्च महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासमोर काढण्यात येणार असून मयत शिक्षण सेवकांना श्रध्दांजली वाहण्यात येणार आहे.

या कॅण्डल मार्चमध्ये जास्तीत जास्त शिक्षण सेवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षण सेवक कृती समिती नांदेडच्यावतीने करण्यात आले आहे.

## जिल्हा बँक भोकर शाखेच्या वास्तूचे आज लोकार्पण

**भोकर (प्रतिनिधी)** – राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी दु. ३ वाजता नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या भोकर शाखेच्या नवीन वास्तूचा लोकार्पण सोहळा होणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सहकार क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला असून, ही बँक संचित तोट्यातून मुक्त झाली आहे. या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील तर अध्यक्ष म्हणुन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून खा. रवींद्र चव्हाण, खा. नागेश पाटील आष्टीकर, खा. डॉ. अजित गोपछडे, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. श्रीजया चव्हाण, आ. हेमंत पाटील, माजी आ. अमरनाथ राजूरकर, माजी आ. हाणमंतराव पाटील बेटमोगरेकर, विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस, जगदीश पाटील भोसीकर, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे आदी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक बाळासाहेब पाटील रावणगावकर, संचालिका सौ. सविता रामचंद्र मुसळे व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अजय कदम व सर्व संचालक मंडळाने केले आहे.




**नांदेड–** येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील कर्मचारी संघटना राज्यस्तरीय संपात १०० टक्के सहभागी झाली आहे. संपाच्या तिसऱ्या दिवशी हक्कांच्या मागण्यासाठी संघटना ठाम असून, जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाहीत तोपर्यन्त संप चालू राहणार, असे कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विक्रमसिंह बैस यांनी सांगितले. यावेळी संघटनेचे प्रतिनिधी पंकज वाठोरे, कलिम भाई, विठ्ठल पंजोल, हवर्गेकर, लुंगारे, महिला प्रतिनिधी श्रीमती ठाकूर, जाधव, पंडितताई व इतर सर्व प्रतिनिधी, कर्मचारी उपस्थित होते.

## ट्रकचा टायर फुटून अपघात; महिला जखमी



**अर्धापूर (प्रतिनिधी)** –नांदेड-हिंगोली हायवेवरील दाभड येथील जिओ पेट्रोल पंपासमोर गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी अपघात झाला आहे. १२ टायर ट्रकचा टायर अचानक फुटल्याने झालेल्या या अपघातात दुचाकीवरील एक महिला गंभीर जखमी झाली आहे.

महामार्ग क्रमांक ३६१ वरून एक दुचाकी भोकरकडून नांदेडकडे जात होती. याच दरम्यान पाठीमागून येणाऱ्या एका १२ टायर ट्रकचा टायर अचानक फुटला. टायर फुटल्याने ट्रकचा दुचाकीला धक्का लागला, ज्यामुळे दुचाकीवरील महिला विमलबाई मारोती भेदेवाड वय ५५ (रा. मंगरूळ ता. हिमायतनगर) त्यांच्या डोक्याला व पायाला जबर मार लागल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. घटनेची माहिती मिळताच रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी संस्थान रुग्णवाहिका चालक राजू पाचंगे यांनी सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने जखमी महिलेला पुढील उपचारासाठी नांदेड येथील खाजगी रूग्णालयात दाखल केले.

## पोलिसांच्या छाप्यात पाच जुगाऱ्यांविरूद्ध गुन्हा दाखल



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड ग्रामीण पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान छापा कारवाई करून पाच जुगाऱ्यांवर गुन्हा दाखल केला. या छाप्यात ४ लाख ७२ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत कोम्बिंग ऑपरेशन करून गुन्हे आणि गुन्हेगारावर आळा घालणे व अवैध धंद्यांवर कारवाई करणे संबंधाने सर्व पो. स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते. त्या अनुषंगाने दि. २२ एप्रिल रोजी रात्री ११ वाजतापासून नमूद अधिकारी व अंमलदार असे पो. स्टे. हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन पेट्रोलिंग करीत असताना गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी ००.२० वाजताचे सुमारास वाजेगाव येथे गेले असता गुप्त बातमी मिळाली की वाजेगाव ते मुदखेड रोडवर आर. के. पेट्रोल पंपाजवळ रोडच्या बाजूला मुरादकोल डेपोसमोर सार्वजनिक मोकळ्या जागेत काही इसम तिर्रट नावाचा जुगार खेळत आहेत. या माहितीवरून पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड, पोहेकॉ. अर्जुन मंडे, पोकॉ. कल्याणकर, पोकॉं. पवार, पोकॉं. सिरमलवार यांनी माहितीच्या ठिकाणी छापा मारला. या घटनेत ५ इसम तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना नगदी रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळून आल्याने यावेळी मुद्देमाल जप्ती पंचनामा करूनू नमूद आरोपीतांविरुद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

## ४७ अंश तापमानात टीनपत्र्याच्या खोल्यांत स्कॉलरशिप परीक्षा घेण्यावरून संताप

### ♦ पालकांचा तीव्र विरोध ♦ पर्यायी केंद्राची मागणी ♦

**लोहा (प्रतिनिधी)** –तालुक्यातील सावरगाव (नसरत) येथे दि. २६ एप्रिल रोजी होणारी चौथीच्या स्कॉलरशिप परीक्षेची केंद्रव्यवस्था वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. येथील शिवनिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ही परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. विद्यालयातील सर्व वर्गखोल्या पत्र्याच्या असल्याने कडक उन्हात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्या मराठवाड्यात उष्णतेची लाट तीव्र असून, नांदेड जिल्ह्यात तापमान ४७ अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदवले जात आहे. अशा परिस्थितीत लहान विद्यार्थ्यांना पत्र्याच्या खोल्यांमध्ये परीक्षा देण्यास भाग पाडणे म्हणजे त्यांच्या जीवाशी खेळ असल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे. उष्माघाताचा धोका लक्षात घेता, एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित शिक्षण विभागावर राहील, असा इशाराही पालकांनी दिला आहे.

विशेष म्हणजे संबंधित विद्यालयातील खोल्या पत्र्याच्या असल्याची माहिती शिक्षण विभागाला असतानाही येथेच परीक्षा केंद्र देण्यात आल्याने शंका व्यक्त केली जात आहे. यामागे नेमके कारण काय, असा प्रश्न करीत प्रशासकीय हलगर्जीपणा, आर्थिक व्यवहार की राजकीय दबाव याबाबत पालकांत उलटसुलट चर्चा सुरू आहे.



दरम्यान, रिसनगाव केंद्रांतर्गत येणाऱ्या या भागात केंद्रप्रमुख पद रिक्त असून, शिक्षण विस्तार अधिकारीही उपलब्ध नाहीत. तक्रार नोंदवण्यासाठी पालकांनी गटशिक्षणाधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र अनेक वेळा फोन करूनही प्रतिसाद न मिळाल्याने नाराजी अधिकच वाढली आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी तडजोड मान्य नाही. अशा परिस्थितीत आम्ही मुलांना परीक्षेला बसवणार नाही, असा पवित्रा पालकांनी घेतला आहे. पर्यायी, सुरक्षित व सुसज्ज केंद्रावर परीक्षा घेण्याची मागणी पालकांनी प्रशासनाकडे केली आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com